**रे.दि.मू.नं. १३०/०९ मधील नि. १०४ खालील आदेश**
**( यशोदा कापसे विरूध्द द्रोपदा चव्हाण )**
**(आदेश पारीत दि. ०६/०२/२०१८)**

प्रस्तुतचा अर्ज यातील वादीने दाव्यामध्ये दुरूस्ती करणेसाठी दाखल केला आहे. वादीने प्रस्तुतच्या अर्जामध्ये वाटपाची व पृथक कब्जाची मागणी केली आहे. सदर अर्जास नि. १०७ वर प्रतिवादीने म्हणणे दाखल केले आहे.

दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील उपलब्ध नि. १ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुतचा दावा फक्त मनाई आदेशासाठी दाखल केलेला आहे. परंतू वादीने नि. १०४ मध्ये वाटपासाठी दुरूस्ती मागितलेली आहे. यावरून दाव्याच्या मुळ स्वरूपात बदल होत आहे. तसेच प्रस्तुतच्या दाव्यामध्ये वादीचे दोन साक्षीदार तपासले आहेत, तसेच त्यांचा उलटतपासही पूर्ण झालेला आहे.

प्रतिवादीचे कथन असे आहे की वादीच्या उलटतपासामध्ये मिळालेल्या कबूल्या नष्ट करणेसाठी प्रस्तुतचा दुरूस्ती अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत प्रकरणात वादींचे दोन साक्षीदारांचा उलटतपास झाला असल्यामुळे सदर दाव्याची सुनावणी सुरू होवून वादीचा दोन साक्षीदारांचा पुर्ण पुरावा झालेला आहे. त्यामुळे नि. १०४ मध्ये नमूद केलेली दुरूस्तीची मागणी मंजूर करणे योग्य वाटत नाही. तसेच सदर दुरूस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरूपात बदल होत आहे. सबब मी खालील आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. नि. १०४ वरील दावा दुरूस्तीचा अर्ज नामंजूर करणेत येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

३. सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी.

**दि. ०६/०२/२०१८**

**(डी.एम.गिरी)**
**सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**खंडाळा**